दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ✿ सोमवार, दि. २७ जुलै २०२६ ✿ वर्ष : १ ✿ अंक : ९७ ✿ पाने : ४ ✿ किंमत : ४ रू. ✿ Email : hinduprakashvarta@gmail.com


## तस्करांनी आणलेले 27 किलो सोने जप्त, 12 जणांना अटक

**नवी दिल्ली :** सोन्याची तस्करी करणाऱ्या संघटित टोळ्यांच्या जाळ्याविरोधातील आपली मोहीम तीव्र करत, महसूल गुप्तचर संचालनालयाने देशभरात गुप्त माहितीच्या आधारे अनेक कारवाया केल्या आहेत. यामध्ये विदेशी बनावटीचे तस्करी करून आणलेले 27 किलोपेक्षा जास्त सोने जप्त करण्यात आले असून 12 जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवायांदरम्यान विमानातील शौचकूप, वाहने व भांड्यांमध्ये बनवलेले विशेष कप्पे आणि शरीरात सोने लपवण्यासारख्या अत्याधुनिक पद्धती उघडकीस आल्या आहेत.

## आश्रमशाळेतील 40 विद्यार्थ्यांना जेवणानंतर अन्नातून विषबाधा

**अमरावती :** अमरावतीच्या मेळघाट परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. धारणी तालुक्यातील टीटंबा येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील सुमारे ३० ते ४० विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. रात्रीचे जेवण केल्यानंतर विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, मळमळ आणि तीव्र पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. विशेष म्हणजे, राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे या मेळघाट दौऱ्यावर असतानाच ही घटना घडल्याने प्रशासनात एकच खळबळ उडाली.

## थोडक्यात वार्ता

### भायखळा पोलीस ठाण्याच्या पहिल्या मजल्यावर आग

**मुंबई:** मुंबईतील भायखळा पोलीस ठाण्यात रविवारी रात्री आग लागल्याची घटना घडली. ही आग पोलीस ठाण्याच्या पहिल्या मजल्यावर लागल्याची माहिती मिळाली असून, सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाल्याची नोंद नाही. प्राथमिक माहितीनुसार, रात्री सुमारे 8.24 वाजण्याच्या सुमारास भायखळा पूर्व येथील हंसराज मार्गावरील भायखळा पोलीस ठाण्यात आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. त्यानंतर अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल, बेस्ट, मुंबई पोलीस आणि संबंधित विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. सर्व यंत्रणांनी संयुक्तपणे आग विझवण्याचे आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे काम हाती घेतले.

### आसाममधील कारखान्यात भीषण स्फोट; 4 जणांचा मृत्यू

**दिसपुर :** आसाममधील कछार जिल्ह्यात रविवारी सकाळी रॉड उत्पादन करणाऱ्या एका कारखान्यात भीषण स्फोट होऊन किमान चार कामगारांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून कारखान्याच्या इमारतीचे मोठे नुकसान झाले आहे. ही घटना सकाळी सुमारे साडेअकराच्या सुमारास उधारबंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पंग्राम येथे असलेल्या काडे ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर एलएलपी या रॉड उत्पादन कारखान्यात घडली. प्राथमिक माहितीनुसार, कारखान्यात अचानक झालेला स्फोट इतका शक्तिशाली होता की इमारतीचे काही भाग पूर्णपणे कोसळले. स्फोटाचा आवाज दूरवर ऐकू गेल्याने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच पोलीस, स्थानिक प्रशासन, अग्निशमन दल आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांचा शोध घेण्यासाठी बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले.

### रेबीजमुळे चिमुकल्या समर्थ स्वामीचा दुर्दैवी मृत्यू

सोलापूर : भवानी पेठ परिसरातील घोंगडे वस्ती येथे कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या समर्थ स्वामी या चिमुकल्याचा उपचारादरम्यान रेबीजमुळे पहाटे दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, संबंधित कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबरोबरच घटनेची चौकशी व भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.घटनेनंतर स्थानिक नगरसेवक राजकुमार पाटील यांनी मृत बालकाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तसेच पीडित कुटुंबाला आर्थिक मदत मिळावी यासाठी पालकमंत्री, महापालिका प्रशासन तसेच आमदार देशमुख यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

याशिवाय, या प्रकरणाची गंभीर दखल घेत सोमवारी महापालिका आयुक्तांसोबत तातडीची बैठक घेण्याची मागणी करण्यात येणार असून, संबंधित वैद्यकीय अधिकारी व विभागाकडून संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणीही करण्यात येणार असल्याचे राजकुमार पाटील यांनी सांगितले. दरम्यान, शहर आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सोमवारी सकाळी १० वाजता मृत बालकाच्या कुटुंबीयांची भेट घेणार असल्याचे सांगितले. तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक या परिसरात कार्यरत असून, समर्थ स्वामीचा मृत्यू रेबीजमुळे झाल्याच्या माहितीला त्यांनी दुजोरा दिला.

## 'युवकांना स्वावलंबी बनवणे हे सरकारचे ध्येय'



**नवी दिल्ली:** 'विकसित वायब्रंट व्हिलेज कार्यक्रम २०२६'च्या सहभागींसोबत रविवारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधताना, देशातील प्रत्येक युवकाला आत्मविश्वासाने आणि स्वावलंबनाने पुढे जाण्यासाठी सक्षम करणे हे केंद्र सरकारचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केले. या विशेष संवादादरम्यान पंतप्रधान मोदींनी सोलो ट्रॅव्हलिंगचे (एकट्याने प्रवास करणे) महत्त्व अत्यंत सविस्तरपणे मांडले. आजच्या तरुणाईमध्ये एकट्याने प्रवास करण्याचा ट्रेण्ड झपाट्याने वाढला असून, हा प्रवास केवळ जग पाहण्याचा मार्ग नसून स्वतःला शोधण्याचा आणि देश समजून घेण्याचा एक सर्वोत्तम व प्रभावी मार्ग आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

पंतप्रधान मोदींनी संवाद साधताना पुढे नमूद केले की, आज देशातील मुले आणि मुली मोठ्या आत्मविश्वासाने स्वतंत्रपणे बाहेर पडत आहेत. तुम्ही सर्वजण जरी वेगवेगळे आणि स्वतंत्रपणे बाहेर पडलात, तरी संपूर्ण भारताच्या या व्यापक प्रवासाने आणि अनुभवाने तुम्हा सर्वांना एकाच कुटुंबासारखे घट्ट एकत्र जोडले आहे. एकट्याने केलेला हा प्रवास आपल्या देशातील तरुण पिढीच्या, विशेषतः भारताच्या लेकींच्या वाढत्या आत्मविश्वासाचे एक अत्यंत जिवंत आणि प्रेरक प्रतीक आहे. आमचे सरकार आणि प्रशासकीय यंत्रणांचे एकमेव ध्येय देशातील प्रत्येक तरुण आणि प्रत्येक लेकीला पूर्ण आत्मविश्वासाने आणि स्वावलंबनाने भविष्यात पुढे नेण्याचे आहे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

पंतप्रधान कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या अधिकृत निवेदनानुसार, 'माय भारत' या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अत्यंत यशस्वीरीत्या राबवण्यात आलेल्या या 'विकसित वायब्रंट व्हिलेज कार्यक्रमाची' मूळ संकल्पना अत्यंत दूरगामी विचारातून आली आहे. भारताच्या सीमावर्ती (बॉर्डर) गावांना देशाची शेवटची गावे न मानता त्यांना देशाची 'पहिली गावे' मानण्याच्या पंतप्रधान मोदींच्या स्पष्ट आणि भक्कम दृष्टिकोनातून ही योजना आकारस आली आहे. देशाच्या विकासाच्या प्रवासात या सीमावर्ती क्षेत्रांना सक्रिय आणि महत्त्वाचे भागीदार बनवणे हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम यंदाच्या वर्षी ४ जून ते ३० जून या कालावधीत अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने दोन टप्प्यांत पार पडला. या संपूर्ण कार्यक्रमात प्रामुख्याने लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या तीन महत्त्वपूर्ण पर्वतीय प्रदेशांमधील एकूण ७४ वायब्रंट गावांचा यशस्वीपणे समावेश करण्यात आला होता. या दुर्गम आणि सामरिकदृष्ट्या संवेदनशील भागांमध्ये तरुणांच्या सहभागामुळे विकासाचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचला आहे.

राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमासाठी देशभरातून प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. देशभरातील ३ लाखांहून अधिक उत्सुक तरुणांनी एका विशेष ऑनलाईन क्विझ (प्रश्नमंजुषा) स्पर्धेत अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला होता. या मोठ्या स्पर्धेतून प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचे प्रातिनिधिक स्वरूप राखत निवड झालेले ४०० हून अधिक हुशार आणि ऊर्जावान तरुण या मुख्य प्रवासासाठी निवडले गेले.

## नंदन निलेकणींच्या नेतृत्वात उच्चाधिकार समितीची स्थापना, PM मोदींचा निर्णय

**नवी दिल्ली :** परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी आणि पेपरफुटीला आळा घालण्यासाठी नंदन निलेकणींच्या नेतृत्वात उच्चाधिकार समितीची स्थापना केल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. जुलै महिन्यात तिसऱ्यांदा तरुणाईशी रीलद्वारे (Instagram Reel) थेट संवाद साधत पंतप्रधान मोदींनी ही माहिती दिली आहे.आधार प्रकल्पाचे प्रमुख शिल्पकार आणि प्रसिद्ध तंत्रज्ञानतज्ज्ञ नंदन निलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती काम करणार आहे. देशातील परीक्षा पद्धत अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि पूर्णपणे तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी समिती शिफारशी करणार आहे.

नीट यूजी २०२६ परीक्षेचा पेपर फुटला यानंतर परीक्षा रद्द करण्यात आली. काही दिवसांनंतर नव्याने परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. पण CJP अशी ओळख मिरवणाऱ्यांनी आणि त्यांच्या समर्थकांनी आंदोलन सुरू केले. अल्पावधीत या आंदोलनाला हिंसक वळण लागले. ठिकठिकाणी पोलिसांवर हल्ले झाले. पेपरफुटी प्रकरणावरून निर्माण झालेल्या तीव्र राजकीय आणि सामाजिक गदारोळाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे आपला दोन पानी राजीनामा पाठवला. राजीनामा देण्यापूर्वी धर्मेंद्र प्रधान यांनी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर केली होती. यामध्ये त्यांनी गेल्या १० दिवसांत घडलेल्या घटनांमुळे आपल्याला अतीव वेदना झाल्याचे म्हटले आहे. "हा माझ्यासाठी वैयक्तिक प्रतिष्ठेचा प्रश्न अजिबात नाही. भारताची युवाशक्ती हीच या देशाची खरी आणि सर्वात मोठी ताकद आहे. मी देशाच्या युवाशक्तीला कोणत्याही दुष्टचक्रात अडकू देणार नाही, हा माझा ठाम निर्धार आहे," असे त्यांनी आपल्या संदेशात सांगितले.दरम्यान राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या (NTA) तब्बल ४७ कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच, पेपरफुटी प्रकरणाच्या जलद आणि पारदर्शक चौकशीसाठी जलदगती न्यायालय स्थापन करण्याची प्रक्रिया देखील आता वेगाने पुढे सरकली आहे.

## मीराबाई चानूची सोनेरी हॅटट्रिक!



**ग्लासगो :** भारताची स्टार वेटलिफ्टर आणि ऑलिम्पिक पदकविजेती मीराबाई चानू हिने ग्लासगो २०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत महिला ४८ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावत इतिहास रचला. या विजयासह चानूने सलग तिसऱ्यांदा राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला. तसेच ग्लासगो २०२६ मध्ये भारताचे पहिले सुवर्णपदकही तिच्याच नावावर जमा झाले.

स्पर्धेच्या स्नॅच प्रकारात मीराबाईने ८५ किलो वजन उचलत नवा राष्ट्रकुल विक्रम प्रस्थापित केला. त्यानंतर क्लीन अँड जर्कमध्ये सुरुवातीचा ८२ किलोचा प्रयत्न अपयशी ठरला. मात्र दुसऱ्या प्रयत्नात तिने हे वजन सहज उचलले. तिसऱ्या प्रयत्नात पुन्हा ८५ किलो वजन उचलून तिने स्पर्धा आणि राष्ट्रकुल विक्रम आपल्या नावावर केला. याच जोमात चानूने १०५ किलो वजन उचलण्याचा धाडसी निर्णय घेतला. प्रेक्षकांच्या जल्लोषात तिने हे वजन यशस्वीरीत्या डोक्यावर उचलत सुवर्णपदक निश्चित केले. या कामगिरीने संपूर्ण स्टेडियममध्ये भारताचा तिरंगा अभिमानाने फडकला. मीराबाई चानूने यापूर्वी २०१८ आणि २०२२ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतही सुवर्णपदके जिंकली होती. आता २०२६ मध्येही सुवर्ण जिंकत तिने राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदकांची हॅटट्रिक केली आहे. भारतीय वेटलिफ्टिंग इतिहासातील ही

## दोषसिद्धी वाढविण्यासाठी ग्रामीण पोलिसांची नवी रणनीती

### पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या पुढाकारातून तपास अधिकारी-सरकारी अभियोक्त्यांची समन्वय बैठक





हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. गुन्ह्यांचा दर्जेदार तपास, वैज्ञानिक पुरावे, सक्षम आरोपपत्र आणि न्यायालयीन अभियोजन अधिक प्रभावी करण्यासाठी जिल्हा व सत्र न्यायालयात तपास अधिकारी व सरकारी अभियोक्त्यांची संयुक्त समन्वय बैठक आयोजित करण्यात आली. ग्रामीण पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या संकल्पनेतून झालेल्या या बैठकीत भविष्यात दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी ठोस कार्यपद्धती निश्चित करण्यात आली.

बैठकीत मुख्य जिल्हा सरकारी अभियोक्ता अविनाश देशपांडे, उपसंचालक तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता सुरेश मोपीडवार, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता एस. व्ही. मुंडवाडकर यांच्यासह २५ हून अधिक सहाय्यक सरकारी अभियोक्ता उपस्थित होते. पोलीस विभागाकडून अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी, विधी सल्लागार अधिकारी कल्पना अवचार, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पैरवी अधिकारी आणि विधी शाखेचे अधिकारी सहभागी झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी तपासाची गुणवत्ता हीच दोषसिद्धीचा पाया असल्याचे स्पष्ट केले. गुन्हा नोंदविण्यापासून निकाल लागेपर्यंत तपास अधिकारी आणि सरकारी अभियोक्ता यांनी एकसंघ पद्धतीने काम केल्यास न्यायालयात दोषसिद्धीची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक गंभीर गुन्ह्यात आरोपपत्र दाखल करण्यापूर्वी सरकारी अभियोक्त्यांशी समन्वय साधणे आवश्यक असल्यावर त्यांनी विशेष भर दिला.

बैठकीत घटनास्थळाचे वैज्ञानिक दस्तऐवजीकरण, पुराव्यांची अखंड साखळी, फॉरेन्सिक आणि इलेक्ट्रॉनिक पुरावे, साक्षीदार व्यवस्थापन तसेच दोषमुक्ती झालेल्या प्रकरणांचे विश्लेषण करून तपासातील त्रुटी दूर करण्यावर सविस्तर चर्चा झाली. भविष्यात नियमित समन्वय बैठका घेऊन गंभीर गुन्ह्यांचा संयुक्त आढावा घेण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

## कैलासनगर स्मशानभूमीचा होणार पुनर्विकास; साकारणार आधुनिक 'वैकुंठ धाम'

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील ऐतिहासिक आणि जुन्या कैलासनगर स्मशानभूमीच्या सर्वांगीण पुनर्विकास प्रकल्पाचे भूमिपूजन आज २६ जुलै रोजी मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात पार पडले.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि सीएसएन फर्स्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला असून, आगामी एका वर्षात या ठिकाणी अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक 'वैकुंठ धाम' साकारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. शहरातील नागरिकांना अत्यंत सन्मानपूर्वक आणि सुसज्ज अंत्यसंस्कार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे एक ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. या महत्त्वपूर्ण भूमिपूजन सोहळ्याला प्रशासकीय आणि राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज व मान्यवर उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, महापौर समीर राजूरकर, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि सीएसएन फर्स्टचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोहळ्यादरम्यान प्रत्येक व्यक्तीला सन्मानपूर्वक अखेरचा निरोप मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार असल्याचे मत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी व्यक्त केले आणि या प्रकल्पासाठी त्यांनी आपली पहिली देणगी देखील जाहीर केली. त्यांच्या पाठोपाठ सीएसएन फर्स्टचे माजी अध्यक्ष ऋषी बागला यांनी देखील सढळहस्ते देणगी देऊन या लोककल्याणकारी उपक्रमाला आपले भक्कम पाठबळ दिले आहे. कैलासनगर ही छत्रपती संभाजीनगर शहरातील सर्वात जुन्या स्मशानभूमींपैकी एक असून, तिचा अत्यंत आधुनिक, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक विकास करण्यासाठी महानगरपालिका व सीएसएन फर्स्ट यांच्यात अधिकृत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार प्रकल्पाची प्रत्यक्ष उभारणी आणि त्याची नियमित देखभाल करण्याची जबाबदारी सीएसएन फर्स्टकडून पार पाडली जाणार आहे, तर या प्रकल्पासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या सर्व मूलभूत नागरी सुविधा महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या संपूर्ण प्रकल्पाचा आकर्षक आणि पर्यावरणपूरक आराखडा प्रसिद्ध वास्तुविशारद महेश साळुंके यांनी तयार केला असून, त्यांनी आपल्या आराखड्यात आधुनिक वास्तुरचना, पर्यावरणपूरक संकल्पना आणि आपली पारंपरिक संस्कृती यांचा अतिशय सुंदर समन्वय साधला आहे. या प्रस्तावित आधुनिक वैकुंठ धाममध्ये नागरिकांच्या सोयीसाठी तब्बल १२ आधुनिक अग्नीसंस्कार केंद्रे आणि विद्युत शवदाहिनीची सुविधा उभारण्यात येणार आहे. तसेच संपूर्ण परिसरात सुंदर लँडस्केपिंग, एक आकर्षक शिवमूर्ती, पाण्याची टाकी, स्वच्छतागृहे, प्रशस्त पार्किंग व्यवस्था, मजबूत अंतर्गत रस्ते, सुरक्षित संरक्षक भिंत, हरित क्षेत्र आणि नागरिकांसाठी अंत्यसंस्काराच्या वेळी बसण्याची हवेशीर व उत्तम व्यवस्था यांसारख्या अत्याधुनिक सुविधांचा समावेश असणार आहे.

## प्रश्नपत्रिका फुटीविरोधी नवीन विधेयक लोकसभेत सादर होणार

**नवी दिल्ली:** प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणावरून संसदेत निर्माण झालेला गतिरोध आता संपण्याची चिन्हे असून, आंदोलक विद्यार्थी आणि विरोधकांच्या प्रमुख मागणीनुसार केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर संसद उद्यापासून सुरळीत चालू होणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर, स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार आणि पेपर लीक रोखण्यासाठी सरकार उद्या लोकसभेत 'सार्वजनिक परीक्षा (अन्यायकारक मार्ग प्रतिबंधक) संशोधन विधेयक, २०२६' सादर करणार आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह हे हे विधेयक मांडणार असून, ते सादर झाल्यानंतर लगेचच मंजुरीसाठीही प्रस्ताव ठेवणार आहेत.

संघटित पेपर लीक प्रकरणात दोषी आढळणाऱ्या व्यक्ती, कोचिंग क्लासेस आणि सेवा पुरवठादारांसाठी वाढीव कारावास आणि भारी आर्थिक दंडाची तरतूद करण्यात आली आहे. खटले जलद गतीने चालवण्यासाठी राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना विशेष सत्र न्यायालयांना 'विशेष फास्ट ट्रॅक न्यायालये' म्हणून घोषित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. गुन्ह्यांचा तपास दोन महिन्यांच्या आत पूर्ण करणे आवश्यक असेल, तर आरोपपत्र दाखल झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत खटला पूर्ण करणे बंधनकारक असेल आणि सुनावणी दररोज घेतली जाईल. उच्चस्तरीय किंवा आंतरराज्यीय परीक्षा फसवणुकीची प्रकरणे हाताळण्यासाठी केंद्र सरकारकडे समर्पित विशेष तपास पथक स्थापन करण्याचा अधिकार असेल. तसेच, परीक्षा गैरप्रकारांच्या खटल्यांसाठी विशेष कायदेशीर वकील नेमण्याचे अधिकार राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आले आहेत.

## "शाल जोडे"




## तडजोडीसाठी बोलावले अन् संपवले; विद्यार्थ्याची निर्घृण हत्या, माजी नगरसेवकाच्या मुलासह सात आरोपी जेरबंद

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात एका किरकोळ वादातून अत्यंत खळबळजनक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. तडजोड (कॉम्प्रमाइज) करण्यासाठी बोलावून अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणाची अतिशय निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याची घटना मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास रोझाबाग परिसरात घडली. नासेर खान तारेक अहेमद असे मृत तरुणाचे नाव असून, या प्रकरणात सिटी चौक पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने तातडीने सूत्रे हलवत एका माजी नगरसेवकाच्या मुलासह सात जणांना बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेमुळे शहरात मोठी सनसनाटी पसरली असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, मृत नासेर खान तारेक अहेमद हा येथील नामांकित पीईएस इंजिनिअरींग महाविद्यालयात अंतिम वर्षात शिक्षण घेत होता आणि तो शहाबाजार भागात आपल्या कुटुंबासह राहत होता. या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात २२ जुलै रोजी एका छोट्याशा वादातून झाली होती. घटनेच्या रात्री नासेर हा त्याच्या भावाचा वाढदिवस असल्यामुळे केक आणण्यासाठी घराबाहेर पडला होता. यादरम्यान, आधीच्या वादावर पडदा टाकण्यासाठी आणि तडजोड



करण्याच्या बहाण्याने आरोपींनी त्याला पंचायत समिती परिसरात बोलावून घेतले. तेथे आधीच दबा धरून बसलेल्या गुंडांनी त्याला बेदम मारहाण केली. मारहाणीनंतर प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी किंवा निर्जन भागात नेण्याच्या उद्देशाने आरोपींनी नासेरला रोझाबाग परिसरात जबरदस्तीने नेले. तिथे त्याच्या डोक्यात प्राणघातक प्रहार करण्यात आला आणि धारदार शस्त्रांनी त्याच्यावर सपासप वार करण्यात आले. या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या हल्ल्यात नासेरचा जागीच मृत्यू झाला. या क्रूर हत्येमुळे मृतकाच्या कुटुंबावर आणि मित्रपरिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटना समजताच मृत नासेरचा मोठा भाऊ आमेर खान व इतर नातेवाईकांनी तातडीने धाव घेतली. या घटनेची माहिती मिळताच सिटी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आणि डीबी पथकाने क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तातडीने फॉरेसिक टीमला (फॉरन्सिक पथक) घटनास्थळी बोलावून सविस्तर पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी (शवविच्छेदन) घाटी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आला असून, रुग्णालयात नातेवाईक व नागरिकांच्या मोठ्या प्रमाणावर गर्दी जमली होती. कोणत्याही अनुचित प्रकाराला आळा घालण्यासाठी परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. सिटी चौक पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा नोंदविण्याची कायदेशीर प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती, तर अटक करण्यात आलेल्या आरोपींची कसून चौकशी केली जात असून यामागे आणखी कोणाकोणाचा सहभाग आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत..

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## अमेरिका-इराण तणाव, लष्करी माघार आणि आखाती देशांतील अनिश्चितता

मध्य-पूर्वेमध्ये पेटलेला अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष अत्यंत गंभीर वळणावर पोहोचलेला असतानाच, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील संभाव्य मोठा लष्करी हल्ला तात्पुरता थांबवण्याचा घेतलेला निर्णय हा जागतिक शांततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे. अमेरिकन लष्कराने दिलेल्या इशाऱ्यानंतर आणि पॅट्रियट इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांचा साठा वेगाने संपण्याच्या भीतीने ट्रम्प प्रशासनाला हे पाऊल उचलावे लागले आहे. एका मोठ्या लष्करी कारवाईमुळे आखाती क्षेत्रात तैनात असलेल्या हजारो अमेरिकन सैनिकांच्या आणि मित्र राष्ट्रांच्या सुरक्षेलाच थेट धोका निर्माण होऊ शकत होता. लष्करी अधिकाऱ्यांच्या व्यावहारिक सल्ल्यानंतर अमेरिकेने सध्या तरी माघार घेतली असली, तरी हा निर्णय तात्पुरता आहे की दीर्घकालीन, याबाबत निर्माण झालेली अनिश्चितता जागतिक अर्थव्यवस्थेसाठी चिंतेची बाब आहे. दुसऱ्या बाजूला, अमेरिकेने हल्ले थांबवताच इराणनेही आखाती देशांमधील अमेरिकन ठिकाणांवरील आपल्या प्रत्युत्तरात्मक कारवाया थांबवल्याची घोषणा केली आहे. "जशास तसे" या धोरणानुसार दोन्ही बाजूंनी सध्या शस्त्रास्त्रे म्यान केली असली, तरी गेल्या २४ तासांत घडलेल्या घडामोडी या परिसरातील भीषण वास्तव दर्शवणाऱ्या आहेत. हुथी बंडखोरांनी सौदी अरेबियातील अत्यंत महत्त्वाच्या तेल शुद्धीकरण कारखान्यावर केलेला क्षेपणास्त्र हल्ला, बहरीनमधील अमेरिकेच्या पाचव्या नौदल तळावर इराणने केलेला ड्रोन हल्ला आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीत व्यापारी जहाजांवर झालेला गोळीबार, या घटनांमुळे आंतरराष्ट्रीय सागरी व्यापार आणि इंधन पुरवठा धोक्यात आला आहे. सर्वात चिंतेची बाब म्हणजे, इराणचे नवीन सर्वोच्च नेते अयातुल्ला मोजतबा खामेनी हे अणुशस्त्रे विकसित करण्याच्या अधिक बाजूने असल्याचे अमेरिकन गुप्तचर संस्थांचे आकलन आहे. चालू युद्धाच्या सावटाखाली इराणने आपल्या अणू मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी पावले उचलल्याने भविष्यात हे युद्ध अधिक पटलावर पसरण्याचा धोका नाकारता येत नाही. आखातातील हा तणाव निवळण्यासाठी दोन्ही देशांनी केवळ तात्पुरती युद्धबंदी न करता, राजनैतिक आणि मुत्सद्दी मार्गाने कायमस्वरूपी तोडगा काढणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा, शस्त्रास्त्रांच्या या स्पर्धेत निष्पाप जीवांसोबतच संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्था भरडली जाण्याची भीती कायम राहील.

# पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण नको!

**नवी दिल्ली येथील जंतर मंतर याठिकाणी सुरु असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात पोलिसांनी बळाचा वापर केला, असा आरोप होत आहे. आंदोलन करणाऱ्या जमावाला वाटेल ते करू देण्यासाठी पोलिस तैनात नाहीत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कायद्यानेच त्यांना काही अधिकार दिले आहेत. जमावाच्या आक्रमकतेवर पांघरूण घालण्यासाठी पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण करणे योग्य नव्हे.**

दिल्लीमध्ये जंतर मंतर येथे 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या (सीजेपी) वतीने 'नीट' पेपरफुटीप्रकरणी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाचा एक भाग म्हणून सीजेपीच्या वतीने संसद भवनावर मोर्चा काढण्यात आला आणि तिथे पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला, म्हणून सर्वत्र पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे. पण पोलिसांची बाजू कोणीच समजून घेत नाही.

स्वतःला विद्यार्थी म्हणवून घेणारे नेमके कोण आहेत, ते माहित नाही. स्वतःला विद्यार्थ्यांचे नेते म्हणवून घेणारे कोणत्या परीक्षेला बसले होते आणि त्या परीक्षांमध्ये काय घोटाळा झाला होता, याचा कुठेही उल्लेख नाही. स्वतःला नेते म्हणवणाऱ्यांपैकी अभिजित दिपके नावाचा कोणीतरी अमेरिकेतून येतो आणि मला आंदोलन करायचे म्हणतो. त्याला दिल्ली पोलिसांनी लगेच जंतर मंतरवर आंदोलन करण्याची परवानगी दिली. म्हणजे त्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, असेही नाही. हे सर्व युवक तिथे आंदोलनाला बसले आणि त्यांनी एकच मागणी लावून धरली आणि ती म्हणजे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. त्या प्रमाणे प्रधान ह्यांनी राजीनामा दिलाही आहे. शिक्षणव्यवस्थेत नेमक्या काय सुधारणा हव्या आहेत शासनाकडून यासंदर्भात त्यांच्या काय अपेक्षा आहेत, याबद्दल त्यांच्याकडून लेखी मुद्दे आलेले दिसले नाहीत. दरम्यान पेपरफुटीप्रकरणी दोषी आढळलेल्या लोकांवर सरकारने कडक कारवाई केली. ती सर्व मंडळी आज तुरुंगात आहे. पेपरफुटीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर 'नीट' परीक्षा तातडीने रद्द करण्यात आली आणि त्यातील त्रुटी दूर करून पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने ती पुन्हा घेण्यात आली. 22 लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली, त्यापैकी 11 लाख विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालायांमध्ये प्रवेश मिळाला. म्हणजे या विद्यार्थ्यांची तशी तक्रार नाही. त्यांची एवढीच अपेक्षा होती, की आमची परीक्षा व्यवस्थित व्हावी आणि चांगले गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना अपेक्षित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा.

सरकारने विद्यार्थ्यांची ही अपेक्षा आपणहून पूर्ण केली. याशिवाय त्यांच्या काही मागण्या असतील तर त्या त्यांनी सरकारला लेखी स्वरूपात द्यायला हव्यात. त्यावर सरकारने विचार करून त्यांची पूर्तता केली असती. पण असे काही न करता त्यांनी 20 जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढणार असल्याचे जाहीर करून टाकले. त्याच दिवशी संसदेचे अधिवेशन सुरू होणार होते. भारतीय संसद हे अतिसंवेदनशील ठिकाण असल्यामुळे आणि तिथे कायदा आणि सुव्यवस्था राखणे, हे पोलिसांचे कर्तव्य असल्यामुळे भारतीय न्यायसंहितेच्या कलम '163 ब' आणि पूर्वीच्या भारतीय दंड संहितेच्या '144' नुसार या परिसरात पाच किंवा अधिक लोकांना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली. अर्थात संसदेवर मोर्चा काढायचा असेल तरी पोलिस परवानगी देतात, पण त्यासाठी मोर्चा काढणाऱ्यांना आपण कोण आहोत, मोर्चा काढण्याचे कारण काय, मोर्चामध्ये किती लोकांचा सहभाग असणार आहे, जमाव तिथे काय करणार आहे, हे स्पष्ट करावे लागते. सीजेपीने अशी कोणतीही परवानगी घेतली नाही. 20 जुलै राजी तिथे देशातल्या अनेक भागांमधून युवक येण्यास सुरूवात झाली. यात विद्यार्थी किती होते, विविध राजकीय पक्षांचे भाडोत्री आंदोलक किती होते, गुंड होते की बेकायदेशीर कामे करणारे होते, याची काहीच कल्पना नव्हती. ही मंडळी आपणहून आलेली नव्हती, तर त्यांना कोणीतरी आणलेले होते. त्यांना आणणाऱ्यांना स्वतःचे चेहरे प्रकाशात येऊ द्यायचे नव्हते. त्यांनी या मुलांना भडकावून धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करा, असे सांगितले होते.

मोर्चा निघताना आम्ही पुष्पगुच्छ घेऊन निघालो आहोत असे दाखवण्यात आले. पण हा केवळ देखावा होता. मागे असलेल्या युवकांसमोर कोणतेही नेतृत्व नव्हते, कोण काय सांगत आहे, याकडे त्यांचे लक्ष नव्हते. संसदेवर काही वेळा हल्ले झाले आहेत, हे आपल्याला माहित आहे. लोकशाहीच्या दृष्टीने संसद ही अत्यंत महत्त्वाची जागा आहे. संसदेवर मोर्चा आल्यानंतर मोर्चेकऱ्यांनी 'बॅरिकेड्स'च्या अलिकडे थांबावे आणि आपल्या दोन-चार प्रतिनिधींना सरकारशी चर्चा करण्यासाठी पाठवावे, हा दंडक आहे. या मोर्चेकऱ्यांनी मात्र 'बॅरिकेड्स' उधळून लावून किंवा त्यांच्यावर चढून संसदेत घुसण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे संसदेमध्ये शिरू पाहणाऱ्या लोकांना आडवण्याची पोलिसांची जबाबदारी असते. हे मोर्चेकरी नुसता शिरण्याचा प्रयत्न करून थांबले नाहीत, तर त्यांनी तिथे जोरदार दगडफेक सुरू केली. त्याचबरोबर या युवकांनी तिथे बंदोबस्तसाठी तैनात असलेल्या पोलिसांवरही हल्ले केले आणि काही पोलिसांना बेदम मारहाण करण्यात आली. अगदी पोलिस शिपायापासून विशेष आयुक्त दर्जाच्या आयपीएस अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांना मारहाण केल्याचे किमान 72 अधिकृत व्हिडिओज उपलब्ध आहेत. या जमावाने तिथे असलेल्या पेट्रोल पंपावर हल्ला केला, महिला पोलिसांवर हल्ला केला, पत्रकारांवर हल्ला केला. म्हणजे यातून त्यांनी कोणालाच सोडले नाही.

हे कमी की काय म्हणून तिथे उभ्या असलेल्या पोलिसांच्या आणि खासगी वाहनांची तोडफोडही करण्यात आली. गरीब रिक्षावाल्यांनाही सोडले नाही. हे सगळे होत असताना दिपकेसहित सीजेपीचे नेते युवकांना मारहाणीसाठी आणि मालमत्तेचे नुकसान करण्यासाठी प्रोत्साहन देताना दिसत होते. म्हणजे स्वतःची जबाबदारी काय, याची कल्पना नसलेले लोक पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत आहेत. मोर्चामध्ये आंदोलक जाळपोळ करत असतील, कोणाला मारहाण करत असतील, सरकारी आणि खासगी मालमत्तेचे नुकसान करत असतील तर पोलिसांनी ते शांतपणे पाहत राहणे अपेक्षित नाही. त्यांना कायदा आणि सुव्यवस्थेच्या रक्षणासाठी तैनात करण्यात आलेले असते. हिंसक मार्गाने जाणाऱ्या आंदोलकांवर कारवाई करण्याचे अधिकार त्यांना कायद्याने देण्यात आले आहेत. या जमावाला पोलिसांनी प्रथम शांतता राखण्याचे आवाहन केले, त्यानंतर त्यांना चेतावणी देण्यात आली आणि त्यानंतर कमरेच्या खाली सौम्य लाठीचार्ज करण्यात आला. तरी जमाव नियंत्रणात येत नाही म्हटल्यावर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. नळकांड्या फुटल्यावर त्याचे धातूचे काही तुकडे जमावातल्या काहींना लागू शकतात. त्यांना पॅलेट्स म्हणण्यात काही अर्थ नाही. या घटनेनंतर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांनी एका व्यक्तीला सर्वांसमोर आणले आणि त्याला झालेल्या जखमा पॅलेट्समुळेच झाल्या असल्याचा दावा केला. पण पोलिसांनी पॅलेट गन्सचा वापर केला असता, तर एकाच व्यक्तीला कशा पॅलेट्स लागतील? तिथे जमा झालेल्या शेकडो लाकांना त्या लागल्या असत्या.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे या मोर्चासाठी तैनात असलेल्या पोलिसांपैकी 150 हून अधिक पोलिस अधिकारी जखमी झाले. ते सगळे रुग्णालयात दाखल आहेत. म्हणजे ते काही हल्ला झाल्याचे खोटे सांगत नाहीत. याउलट जमावापैकी कोणालाही रुग्णालयात दाखल करण्याची गरज भासली नाही. पोलिसांच्या लाठीचार्जमध्ये एका मुलीचा मृत्यू झाल्याची आवई उठवली गेली, तीही खोटी ठरली. या सगळ्या घटनाक'माचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये चित्रण झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी बळाचा वापर केला म्हणून त्यांच्यावर खापर फोडणे योग्य नाही. आंदोलकांची संसदेमध्ये चर्चा करायची तयारी नाही. संसद ठरावीक नियमांप्रमाणे चालते. तिथे मुद्द्यांवर चर्चा केली जाते, प्रक्रियेला वेळ लागतो, पण आंदोलकांना सगळे आत्ताच्या आत्ता हवे आहे. योगेंद्र यादव नावाचे महाशय स्वतःला पत्रकार किंवा नेता म्हणवतात. ते म्हणतात, आता निर्णय संसदेत नाही, तर रस्त्यावर होतील. म्हणजे झुंडशाहीचेच राजकारण चालणार का? झुंडशाहीला हे तथाकथित नेतेच प्रोत्साहन देत आहेत. आज दिल्लीमध्ये दंगल झाली, उद्या कर्नाटक, केरळ किंवा इतर बिगर भाजपाशासित राज्यांमध्येही हे होऊ शकेल. सगळीकडे आपल्याला दंगलीच करायच्या आहेत का, हा मुद्दा आहे.

मुंबईमध्येही निदर्शने झाली. तिथे पोलिसांनी काही लोकांना थोड्या कालावधीसाठी अटक करून सोडून दिले. तर इथले नेते म्हणतात, की तुम्ही कोण आम्हाला हात लावणारे? सर्वोच्च न्यायालयाने वारंवार स्पष्ट केले आहे, की रस्ता ही निदर्शने करण्याची जागा नाही. रस्त्यावर वृद्ध लोक असतात, रुग्णवाहिका येत-जात असतात, सामान्य नागरिक कामासाठी बाहेर पडलेले असतात. रस्त्याचा वापर करण्याचा पहिला हक्क त्यांचा आहे. प्रत्येक ठिकाणी काही मैदाने आहेत. अशा ठिकाणी परवानगी घेऊन शांततेच्या मार्गाने आंदोलने केल्यास ही समस्याच उद्भवणार नाही. झुंडशाहीला राजकीय पक्षांनी प्रोत्साहन द्यायचे की नाही, हा मुद्दा आहे. या झुंडशाहीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वसामान्यांच्या संमतीनेच शासनाने पोलिसांना कारवाईचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे कोणीही उठून पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करू नये.

**- प्रवीण दीक्षित (माजी पोलिस महासंचालक)**

## करंजगावात मोफत आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद




**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**करंजगाव :** संवेदना डेव्हलोपमेंट सोसायटी आणि एच जी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करंजगाव येथे मोफत जनरल आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा गावातच उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराला महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक आणि युवकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.

शिबिरात नागरिकांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब (बीपी) तपासणी, विविध आजारांचे निदान, वैद्यकीय सल्ला तसेच आवश्यकतेनुसार मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. निरोगी जीवनशैली, नियमित आरोग्य तपासणी आणि आजारांचे लवकर निदान याबाबतही जनजागृती करण्यात आली.

यावेळी प्रोग्राम कोऑर्डिनेटर सचिन लिमकर, इर्शाद सय्यद, कृष्णा सरोवर, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामीण भागात आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकासासाठी संवेदना डेव्हलोपमेंट सोसायटी व एच जी फाउंडेशन विविध लोकहिताचे उपक्रम सातत्याने राबवत असून, भविष्यातही असे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. आयोजनासाठी ग्रामपंचायत, स्वयंसेवक आणि ग्रामस्थांचे आभार मानण्यात आले.

## महावितरणच्या गलथान कारभारामुळे विद्युत शॉक लागून शेतकऱ्याचा जागीच मृत्यू.

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी**



**परभणी:-** पूर्णा शहरात लगतच्या शेतात लोंबत असलेल्या विद्युत वाहिनीचा शॉक लागून एका 45 वर्षीय शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला असल्याचे घटना उघडकीस आली असून मागील दोन दिवसापासून घरातून बेपत्ता असलेल्या शेतकऱ्याचा मृतदेह 25 जुलै रोजी शनिवारी शेतातील नाल्यात आढळून आला असून याप्रकरणी पूर्णा पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची. नोंद करण्यात आली आहे

अधिक माहिती अशी की राजेश नामदेव सोनवणे वय 45 वर्षे राहणार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर पूर्णा शहरालगतच्या असलेल्या शेतातील आखाड्यातील जनावरांना वैरण व पाणी देण्याकरिता ते 23 जुलै रोजी सकाळी सुमारे अकरा वाजता घरातून निघाले परंतु रात्री उशिरापर्यंत घरात परत न आल्याने कुटुंबीयांनी त्यांच्या शोध सुरू केला इतर अनेक ठिकाणी त्यांचे चौकशी केली असता ते आढळून. न आल्याने बेपत्ता झाल्याची तक्रार पुन्हा पोलिसात दाखल करण्यात आली. 25 जुलै रोजी दुपारी नातेवाईक शेतात शोध घेत असताना राजेश सोनवणे यांचा मृतदेह शेतात खोदलेल्या नाली मध्ये पडलेल्या अवस्थेत आढळून आला. फौजदार श्रीनिवास पडलवार बीट जमादार आनंद सोनकांबळे राहुल मोरे यांनी घटनास्थळी धाव घेतली व पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेत शव विच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय पूर्णा येथे पाठवण्यात आले.

शव विच्छेदनानंतर त्यांचा मृत्यू विजेचा शॉक लागून झाल्याचे स्पष्ट केले. पोलिसांच्या प्राथमिक तपासणीत शेतातील लोबनाऱ्या विद्युत वाहिनीचा शॉक लागल्याने ही घटना घडल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे या घटनेमुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात असून सोनवणे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले भाऊ असा परिवार आहे पुढील तपास पोलीस जमादार राहुल मोरे हे करीत आहेत.

# विठ्ठल नामाच्या गजरात 'विठ्ठल गीती गावा-२०२६' भक्तिमय सोहळा उत्साहात संपन्न

## लासूर स्टेशन येथे आषाढी एकादशीनिमित्त अभंग, भजन व महाप्रसादाचा भक्तिमय संगम

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**लासूर स्टेशन :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त स्वर-शारदा संगीत अकॅडमी आणि नवतरुण भजनी मंडळ, लासूर स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विठ्ठल गीती गावा–२०२६' हा भक्तिमय संगीत सोहळा विश्वकर्मा मंदिर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील सुमारे ३०० वारकरी व विठ्ठलभक्तांनी उपस्थित राहून विठ्ठल नामाच्या गजरात भक्तिरसाचा आनंद लुटला.

कार्यक्रमात बालकलाकारांसह नवतरुण भजनी मंडळाच्या सदस्यांनी संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव आदी संतांच्या अभंगांचे सुरेल सादरीकरण करून वातावरण भक्तिमय केले. संगीत अलंकार प्रा. अण्णासाहेब आढाव यांच्या भावपूर्ण गायनाने उपस्थितांना




मंत्रमुग्ध केले. पुणे येथील चैतन्य शिवगंध यांनी पखवाजावर, तर नागपूरचे सम्यक रंगारी यांनी तबल्यावर उत्कृष्ट साथसंगत करत कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण युट्यूब लाईव्हद्वारे करण्यात आले.

यावेळी रवी चव्हाण, संदीप अमराव, सुनील पाखरे आणि अमोल जाधव यांनी उपस्थित राहून कलाकारांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात सहभागी झालेल्या काव्या दाभाडे, हर्षदा परदेशी, स्वराली पठारे, वैष्णवी बोडके, मानवी भुसारे, श्रेयश बडोगे, पूजा परदेशी आणि त्रिवेणी पवार या बालकलाकारांचा नवतरुण भजनी मंडळातर्फे सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. किशोर जगताप यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नवतरुण भजनी मंडळाचे अशोक राऊत, चांगदेव गायकवाड, नवनाथ सोमवंशी, गणेश सोमवंशी, द्वारकादास आव्हाड, सुनील धनवट, बद्रीनाथ बडोगे, राजेंद्र गायकवाड तसेच स्वर-शारदा संगीत अकॅडमीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# कृषी विद्यापीठात "सिल्क-मिल्क' कार्यशाळा संपन्न; "रेशीम शेतीची आस धरा, लक्ष्मी येईल तुमच्या घरा"

## उत्पन्न वाढीसाठी शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीला रेशीम व दुग्ध व्यवसायाची जोड द्यावी – पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधि**



परभणी, दि. २६ — परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्पन्न दुप्पट करण्यासाठी पारंपरिक शेतीला 'सिल्क आणि मिल्क' (रेशीम शेती व दुग्ध व्यवसाय) यांची जोड द्यावी. जिल्ह्यात रेशीम शेती व उद्योगाला चालना देण्यासाठी विशेष अर्थसहाय्य, रेशीम प्रक्रिया उद्योगांची उभारणी, 'रेशीम भवन' उभारणी तसेच उत्पादनापासून प्रक्रिया आणि विपणनापर्यंत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली. शेतकऱ्यांसाठी 'सिल्क विथ मिल्क' हे उत्पन्नवाढीचे प्रभावी मॉडेल ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

रेशीम संशोधन योजना, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, कृषि विभाग, आत्मा, केंद्रीय रेशीम बोर्ड, परभणी जिल्हा रेशीम कार्यालय परभणी, अग्रणी बँक, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विद्यापीठात आज "शाश्वत शेतीकडे वाटचाल, सिल्क व मिल्क, एनडीकेएसपी 2.0 व मेरा रेशीम मेरा अभिमान 2.0 शेतकरी कार्यशाळा" पार पडली. या कार्यशाळेचे उदघाटन पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमास वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु, डॉ. इंद्र मणि, जिल्हाधिकारी, श्री. संजयसिंह चव्हाण, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, नतिशा माथुर, उपमहाप्रबंधक (भारतीय स्टेट बँक) श्री. वाय. व्ही. एस. एस. नागेश्वरराव, विद्यापीठाचे संचालक (संशोधन) डॉ. भगवान आसेवार, संचालक (शिक्षक ) डॉ. बाबासाहेब ठोंबरे, उपसंचालक (रेशीम) डॉ. महेंद्र ढवळे, जिल्हा रेशीम विकास अधिकारी शंकर वराट,

प्रकल्प संचालक (आत्मा) दौलत चव्हाण, वित्तीय सल्लागार सुनील हट्टेकर, जिल्हा व्यवस्थापक (अग्रणी बँक) रामचंद्र अकुलवार आदींसह मोठया संख्येने शेतकरी उपस्थित होते.

पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, बदलत्या हवामानामुळे शेतीसमोर अनेक नवी आव्हाने निर्माण होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी निराश किंवा खचून न जाता आत्मविश्वासाने शेती करावी. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, त्यांच्या हितासाठी सातत्याने विविध निर्णय घेत आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी अनेक लोकहिताचे निर्णय घेण्यात आले आहेत. राज्य शासनाने "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने"च्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. तसेच शेतकऱ्यांची वीजबिल माफी, शेतमालाला हमीभाव आणि महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

शेती अधिक फायदेशीर करण्यासाठी तरुणांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रेशीम शेती, दुग्ध व्यवसाय आणि प्रक्रिया उद्योगांकडे वळावे. पारंपरिक शेतीला जोडधंद्याची साथ दिल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न निश्चितच वाढू शकते, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज मिळावा याकरिता परभणीसाठी सी-डॉप्लर रडार मंजूर करण्यात आले असून मार्च २०२७ पर्यंत ते कार्यान्वित होणार आहे.

पुढील महिन्यात 'इन्व्हेस्टिंग परभणी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमातून शेतमाल प्रक्रिया क्षेत्रातील उद्योगांना चालना मिळणार असून, मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक जिल्ह्यात होणार आहे. या गुंतवणुकीमुळे मोठ्या प्रमाणावर उद्योग उभे राहतील आणि महिला तसेच तरुणांसाठी रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील, असा विश्वास पालकमंत्र्यांनी व्यक्त केला.

कुलगुरू डॉ. इंद्र मणि म्हणाले की, पारंपरिक शेतीसोबत 'सिल्क आणि मिल्क' या संकल्पनेचा स्वीकार केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होईल. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी रेशीम शेतीसारख्या पर्यायी आणि लाभदायक शेतीकडे वळावे. जिल्ह्यात रेशीम शेतीच्या विकासासाठी कृषी विद्यापीठाचे महत्त्वपूर्ण योगदान असून, विद्यापीठात रेशीम संशोधन केंद्र सुरू व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण म्हणाले की, परभणी हा शेतीप्रधान जिल्हा असून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी 'सिल्क आणि मिल्क' हा उत्तम पर्याय आहे. रेशीम शेती, दुग्ध व्यवसाय आणि शेतमाल प्रक्रिया उद्योगांना चालना दिल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

बँकांनी देखील शेतकऱ्यांना आवश्यक सहकार्य करावे. प्रशासनही शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, सर्वांच्या सहकार्याने परभणी जिल्हा 'सिल्क-मिल्क' क्षेत्रात निश्चितच आघाडीवर जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उपमहाप्रबंधक (भारतीय स्टेट बँक) श्री. वाय. व्ही. एस. एस. नागेश्वरराव यांनी कृषी विकासात बँकांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे सांगितले. रेशीम शेतीसह विविध कृषी उपक्रमांसाठी शेतकऱ्यांना आवश्यक कर्ज व आर्थिक सहकार्य करण्यात येईल. अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रास्ताविकात उपसंचालक (रेशीम) डॉ. महेंद्र ढवळे यांनी रेशीम शेतीचे महत्त्व सांगितले. परभणी जिल्ह्यात रेशीम शेतीला चालना देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी या शेतीचा स्वीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यशाळेचे उदघाटन झाले. त्यानंतर सिल्क-मिल्क लोगो व घडीपत्रिकेचे विमोचन करण्यात आले.

रेशीम शेती करणारे प्रगतीशील शेतकरी भागवत इधाटे, सरस्वती मायंदळे, मोहन कापसे, रामराम सलगर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रगतीशील शेतकरी आणि उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी यांचा पालकमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन वित्तीय सल्लागार (अग्रणी बँक) सुनील हट्टेकर यांनी केले.

## घाटीत 20 वी विभागीय पदव्युत्तर बालरोग प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात संपन्न



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (घाटी) येथील बालरोग विभाग आणि इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स (आयएपी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २० वी आयएपी पदव्युत्तर बालरोग प्रश्नमंजुषा स्पर्धा – विभागीय फेरी २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात बजाज भवन येथे पार पडली. या स्पर्धेत लातूर, अंबाजोगाई, जालना आणि छत्रपती संभाजीनगर येथील आठ वैद्यकीय महाविद्यालयांच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या संघांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपअधिष्ठाता डॉ. गायत्री तडवळकर, बालरोग विभागप्रमुख डॉ. प्रभा खैरे, उपअधिष्ठाता डॉ. विनोद मुंडाडा, आयएपी छत्रपती संभाजीनगर शाखेच्या अध्यक्षा डॉ. संध्या कोंडापल्ले आणि सचिव डॉ. विनोद तोतला यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धेदरम्यान नवजात शिशुरोग, संसर्गजन्य आजार, बालहृदयरोग, बालमूत्रपिंड विकार, पोषण, लसीकरण, आपत्कालीन बालरोग तसेच बालरोगशास्त्रातील अद्ययावत घडामोडींवर आधारित विविध फेऱ्या घेण्यात आल्या. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय ज्ञानाची कसोटी लागली.

या उपक्रमामुळे पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यासोबतच विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक देवाणघेवाण, संशोधनवृत्ती आणि निरोगी स्पर्धेची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रमास विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, निवासी डॉक्टर आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## भैरवनाथ ग्रामिण बिगर शेती सह.पतसंस्थेची 28 वी वार्षिक सर्वसाधारण सभा

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२६ जुलै :** सोयगाव येथील भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित सोयगाव यांची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१ ऑगस्ट शनिवार रोजी संस्थेच्या कार्यालयात सकाळी १०.०० वाजता करण्याचे ठरविले आहे.संस्थेच्या सर्व सभासदांना अहवाल पाठविला आहे. ज्यांना अहवाल मिळाला नाही अशा सभासदांनी हाच अहवाल समजून सभेस वेळी व स्थळी उपस्थित रहावे ही विनंती सभेपुढील येणारे विषय विषय क्रमांक एक मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत चा वृत्तांत वाचून कायम करणे,विषय नंबर दोन सन.२०२५-२६ या वर्षाचे संचालक मंडळाने मंजूर केलेले आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे,

विषय नंबर तीन सन.२०२५-२६ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे,विषय नंबर चार सन. २०२५-२६ करिता संचालक मंडळांनी शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे,विषय नंबर पाच सन.२०२६-२७ करिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे,विषय नंबर सहा सन.२०२५-२६ ऑडिट दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे,विषय नंबर सात स.न.२०२६-२७ करिता लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे बाबत,विषय क्रमांक आठ चेअरमन यांना मानधन ठरविण्याबाबत,विषय क्रमांक नऊ मे अध्यक्ष यांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे बाबत, तरी सर्व संचालक व सभासद बंधू व निमंत्रित मान्यवरांनी सभेस उपस्थित राहावे असे अहवाल संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर(आबा) दयाळराव काळे व व्यवस्थापक धनराज औरंगे, लिपिक विजय जावळे,शिपाई योगेश काळे यांनी केले आहे.

### शेतकरी संकटातून बाहेर पडणार

## जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना मिळणार कर्जमाफी

### पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांची माहिती

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:-** राज्य महायुती सरकार मधील राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी महाराष्ट्रातील संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्याचे कर्ज व विज बिल माफ करण्याचा निर्णय घेतला असून त्यांनी कुठलीही निवडणूक नसताना सुद्धा दिलेला शब्द पाळला. तसेच माता भगिनी युवक व शेतकऱ्यांसाठी अनेक विविध प्रकारच्या योजना आणून या माफीमुळे बळीराजा आर्थिक संकटातून नक्कीच बाहेर पडणार असल्याचा आत्मविश्वास राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केला. दिनांक 26 जुलै रविवार रोजी भाजपा महानगर च्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत मध्ये त्या बोलत होत्या यावेळी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस रंगनाथ सोळंके व्यासपीठावर उपस्थित होते

पुढे बोलताना पालकमंत्री नामदार बोर्डीकर म्हणाले की जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना पहिल्याच यादि नुसार कर्जमाफी देण्यास सुरुवात झाली असून उर्वरित सर्व पात्र शेतकऱ्यांना लवकरच कर्जमाफी चा व शेतकऱ्यांसाठी 7.5 एचपी पर्यंत ची कृषी पंपाची वीज माफी व दररोज 12 तास वीज पुरवठा देण्यास सुरू केले आहे महाराष्ट्र सरकारने महिलांसाठी वमहिला शेतकऱ्यांसाठी सक्षमीकरण विधेयक आणले आहे. मागील त्याला शेततळे शेतकरी सन्मान योजना डेटा ड्रोन डिजिटल व ए आईच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जोडणे पिक विमा कृषी यांत्रिकीकरण कृषी सिंचन योजना कापूस व कांदा सोयाबीन याची सरकारकडून खरेदी करून लाखो शेतकऱ्यांना दिलासा दिला त्या विविध योजना शेतकऱ्यांसाठी आणल्या असून थेट शेतकऱ्यांना त्याचा लाभ दिला जात आहे आत्मनिर्भर होत असून कृषी क्षेत्राच्या विविध योजनांसाठी महाराष्ट्र शासनाकडून दरवर्षी सुमारे 95 हजार कोटी रुपयांची तरतूद दिली जात असून दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी सहा लाख कोटींची योजना आणून ज्याच्यातून नद्याचे 2.75 टीएमसी पाणी धरणामध्ये आणले जाणार आहे धरणाचे पाणी मराठवाड्यात कडे वळवल्याने येणाऱ्या पिढीला दुष्काळाचा सामना करावा लागणार नाही जागतिक महिला शेतकरी वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले आहेत त्यामुळे महिला शेतकऱ्यांना स्वातंत्र्य ओळख निर्माण होणार असल्याचे ही त्यांनी सांगितले शेतकरी आत्महत्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना अभ्यास करून त्यांच्या आवाक्या नुसार शेतकऱ्याला आणखीन काय मदत करता येईल यावर विचार विनिमय करण्यात येईल शेतीला जोड पूरक व्यवसाय करावा शेतीपूरक जोडधंदा करावा केवळ शेतीवरच अवलंबून न राहता जोड धंद्यामुळे त्यांना आर्थिक मदत मिळू शकते व ते आत्महत्या करण्यास प्रवर्त होणार नाहीत राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये असे आवाहनही पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी केले. यावेळी पत्रकार परिषदेला भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## अध्यात्म आणि विज्ञानाच्या समन्वयातूनच खरा विकास : कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि

### शेतकऱ्यांनी बांधावर वृक्षांची लागवड करून बांध सजीव करावेत; विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करून संस्कार जपावेत : कृषिरत्न आबासाहेब मोरे

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. इंद्र मणी. कृषिरत्न मा. श्री. आबासाहेब मोरे (श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग, दिंडोरी प्रणित, नाशिक) वनामकृवि–श्री स्वामी समर्थ ट्रस्टमध्ये सामंजस्य करार माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि कृषिरत्न मा. श्री. आबासाहेब मोरे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत भाकृअनुप–अखिल भारतीय समन्वयित संशोधन प्रकल्प (पशुसंवर्धनाचे यांत्रिकीकरण) यांच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या बैलचलित सुधारित शेती अवजारे कस्टम हायरिंग सेंटर स्थापनेसंदर्भात श्री स्वामी समर्थ कृषि विकास व संशोधन चॅरिटेबल ट्रस्ट, दिंडोरी (जि. नाशिक) यांच्याशी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला असून त्यानिमित्त नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक २४ जुलै २०२६ रोजी विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात संपन्न झाला.

अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कृषिरत्न मा. श्री. आबासाहेब मोरे (श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग, दिंडोरी प्रणित, नाशिक) उपस्थित होते. व्यासपीठावर संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, कुलसचिव श्री. पुरभा काळे, विद्यापीठ अभियंता इंजी. दीपक कशाळकर, सहाय्यक नियंत्रक श्री अनंत कदम, संशोधन अभियंता डॉ. दयानंद टेकाळे, ट्रस्टचे कार्यक्रम समन्वयक श्री. बाळासाहेब शिंदे, प्रगतशील शेतकरी उद्यान पंडित श्री प्रतापराव काळे, श्रीमती ज्योती भूक्तार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमामध्ये सामंजस्य करारावर स्वाक्षरी, शाकंभरी सीड बँकेच्या प्रमाणपत्रांचे वितरण तसेच मान्यवरांचे मार्गदर्शन झाले.

अध्यक्षीय भाषणात माननीय कुलगुरूंनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून अपेक्षित उद्दिष्ट पूर्ण होवो, अशी प्रार्थना व्यक्त केली. अध्यात्म आणि विज्ञान जेव्हा एकत्र येतात, तेव्हाच खरा विकास घडतो. अध्यात्माशिवाय विज्ञान अपूर्ण आहे, असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, विद्यापीठ शिक्षणाबरोबरच संशोधन आणि विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून जनसेवा व शेतकऱ्यांची सेवा करण्यास प्राधान्य देत आहे. श्री स्वामी समर्थ सेवाभावी संस्थेद्वारे आदर्श व दिशादर्शक कार्य उभारले जात असून, या संस्थेच्या कार्याबद्दल त्यांनी मनःपूर्वक आदर व्यक्त केला. आपण पुण्याचे कार्य करत आहात. समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी कार्यरत आहात. विकासासाठी शेती आणि शेतकरी यांची निवड करून आपण अत्यंत महत्त्वाचे कार्य हाती घेतले आहे, असे सांगून त्यांनी श्री. आबासाहेब मोरे यांचे अभिनंदन केले. या कार्यामागील त्यांची समर्पण भावना व तपश्चर्या उल्लेखनीय असल्याचे सांगताना ते म्हणाले की, सर्वांना सोबत घेऊन वाटचाल करणे अत्यंत कठीण असते; मात्र आपण तपस्वी वृत्तीने हे कार्य करत आहात. त्यामुळे आपण खऱ्या अर्थाने एक तपस्वी आहात, असे आदरयुक्त उद्गार त्यांनी श्री. आबासाहेब मोरे यांच्याविषयी काढले.

## पेन्सिलचा ढोक डोळ्यात घुसला; घाटीतील यशस्वी शस्त्रक्रियेत चार वर्षीय चिमुकलीची दृष्टी वाचली



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** खेळत असताना पेन्सिलचा टोक डोळ्यात घुसल्याने चार वर्षीय चिमुकलीच्या कॉर्नियाला (बाह्य नेत्रपटल) गंभीर दुखापत झाली. या गंभीर अवस्थेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील नेत्रशल्य चिकित्सा विभागाने तातडीने शस्त्रक्रिया करून चिमुकलीची दृष्टी वाचविण्यात यश मिळविले.

दुखापतीनंतर सुरुवातीला मुलीवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले होते. मात्र, शस्त्रक्रियेची गुंतागुंत आणि संभाव्य खर्च लक्षात घेऊन पुढील उपचारांसाठी तिला घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे नेत्रशल्य चिकित्सा विभागाने सखोल तपासणी करून तातडीने शस्त्रक्रियेचे नियोजन केले.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागप्रमुख डॉ. अर्चना वरे पाटील यांच्या नेतृत्वात डॉ. महेश सोनपेठकर, डॉ. वेणुगोपाल रांगू आणि डॉ. तपन जक्कल यांनी अत्यंत कौशल्याने ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. यावेळी वरिष्ठ निवासी डॉ. मोहन मोरखडे, डॉ. इमाद ख्वाजा तसेच कनिष्ठ निवासी डॉ. मधुश्री, डॉ. सोनिया, डॉ. साक्षी, डॉ. शीतल आणि डॉ. अनुष्का यांनीही महत्त्वाचे सहकार्य केले. शस्त्रक्रियेदरम्यान बधिरीकरणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. गायत्री तडवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक प्राध्यापक डॉ. प्रेरणा शिंदे व त्यांच्या पथकाने बधिरीकरणाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. तसेच परिचारिका कालिंदी इधटे, यमुना मुंढे, गीता गीते, सोनाली गायकवाड, विकास गायकवाड, अर्चना सांगळे आणि शस्त्रक्रिया कक्षातील कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

उपचारानंतर चिमुकलीची प्रकृती समाधानकारक असून तिची दृष्टी सुरक्षित ठेवण्यात डॉक्टरांना यश आले आहे. या यशस्वी उपचाराबद्दल मुलीच्या पालकांनी आणि नातेवाईकांनी घाटी रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. शासकीय रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा आणि अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांमुळे दर्जेदार उपचार मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## आषाढी वारीत एमजीएमच्या विद्यार्थ्यांची सामाजिक बांधिलकी; छोटा पंढरपूर येथे स्वच्छता मोहीम



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) स्वयंसेवकांनी वाळूज येथील प्रसिद्ध छोटा पंढरपूर येथे स्वच्छता मोहीम राबवत सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत मंदिर परिसर आणि यात्रा मार्ग स्वच्छ करून भाविकांसाठी स्वच्छ व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने छोटा पंढरपूर येथे हजारो भाविक दर्शनासाठी येत असल्याने परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी मंदिर परिसरासह संपूर्ण यात्रा मार्गाची स्वच्छता केली. स्वयंसेवकांनी ओला आणि सुका कचरा वेगवेगळा संकलित करून तो महानगरपालिकेच्या कचरा संकलन केंद्राकडे सुपूर्द केला. यासोबतच पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेचे महत्त्व भाविकांना पटवून देत जनजागृतीही करण्यात आली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी 'मोबाईल व्यसनमुक्ती', 'प्लास्टिकला नकार', 'वाहन प्रदूषण नियंत्रण', 'निरोगी भारत – आपले ध्येय', 'स्वच्छता अभियान' आणि 'नशामुक्त भारत' अशा विविध सामाजिक संदेशांचे फलक हातात घेऊन भाविकांना जागरूक केले. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे भाविकांनीही उत्स्फूर्त स्वागत करत त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वाचे कौतुक केले.


ही स्वच्छता मोहीम यशस्वी करण्यासाठी डॉ. विनोद मोकळे, प्रा. सोमनाथ काळेगावकर तसेच सर्व संबंधितांचे योगदान लाभले. राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. आर. आर. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगावचा डंका

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२६ जुलै

वर्ग ४ थी व वर्ग ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये उपक्रमशील जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथील वर्ग चौथी मधील सहा विद्यार्थी पात्र ठरलेले असून वर्ग सातवी मधील सात विद्यार्थी असे एकूण तेरा विद्यार्थी पात्र ठरले आहे. या सर्व पात्र विद्यार्थ्यांचे गटशिक्षण अधिकारी अक्षय धंदर,सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या सह पालकांनी अभिनंदन केले.असून शिष्यवृत्ती परीक्षेसाठी या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,वर्गशिक्षक सुरेखा चौधरी,रामचंद्र महाकाळ यांच्यासह मंगला बोरसे, सविता पाटील,प्रतिभा कोळी,गणेश बाविस्कर,अकुश काळे, विवेक महाजन, अनिल देसाई, तानाजी चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले आहे.



कु.प्राची नितीन सोनवणे प्राप्त गुण १९८ | कु.शुभ्रा दत्तात्रय सोहनी३ प्राप्त गुण १८६ | कु.श्रुष्टी आण्णा वाघ प्राप्त गुण १८० | कु.गायत्री संजय मिसाळ प्रप्त गुण १६८ | कु.सुजाता निलकंठ खलसे प्राप्त गुण १६० | कु.मानसी भगवान पंडीत प्राप्त गुण १६० | कु.पुर्वा कैलास सोनवणे प्राप्त गुण १३४

ईयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेत ६ विद्यार्थी पात्र



कु.आरोही दादाराव राठोड प्राप्त गुण २०४ | चि.सिध्दार्थ दिलीप नवगिरे प्राप्त गुण १७० | कु.तन्वी अतुल बाविस्कर प्राप्त गुण १५६ | चि.सुलतान अली मुबारक पठाण प्राप्त गुण १४६ | चि.रूद्र ज्ञानेश्वर आगे प्राप्त गुण १२६ | कु.ऋतुजा संदिप ढगे प्राप्त गुण १२६

## आषाढी एकादशी निमित्त मिल कॉर्नर येथे विठ्ठल नामस्मरण व महाप्रसादाचा भक्तिमय सोहळा उत्साहात



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त मिल कॉर्नर येथे सु-लक्ष्मी ग्रुपच्या वतीने श्री विठ्ठल नामस्मरण व महाप्रसादाचे भक्तिमय आयोजन उत्साहात पार पडले. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम घडविणाऱ्या या कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे उद्घाटन दीपकजी कर्नवाल आणि अंकित पटेल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी दीपक कर्नवाल, अंकित पटेल, डॉ. नंदलाल बोथरा, शुभम बोथरा, रोहित कोटेचा, प्रदीप पवार, संतोष गायकवाड, डी. बी. पाटील, मानकर, राजपूत, सचिन निकम, संतोष राजपूत, प्रेम लिंगायत, यश, सौ. लता, सौ. पूजा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून श्री विठ्ठलाच्या नामस्मरणात तल्लीन होत भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेतला. "जय हरी विठ्ठल", "ज्ञानोबा-तुकाराम" अशा गजरांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. नामस्मरणानंतर आयोजित महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सु-लक्ष्मी ग्रुपचे पदाधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## 'सेवापथ सोशल फाउंडेशन'तर्फे पंढरपुरात वारकऱ्यांसाठी मोफत फराळ वाटप



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर / पंढरपूर :** महाराष्ट्र संस्कृतीचा महामेळा असलेल्या पवित्र आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर 'सेवापथ सोशल फाउंडेशन' एनजीओच्या वतीने पंढरपूर येथे विठ्ठल दर्शनासाठी आलेल्या लाखो वारकऱ्यांसाठी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वारीच्या वाटेवर चालणाऱ्या आणि पंढरपुरात पोहोचलेल्या भाविकांसाठी संस्थेच्या वतीने मोफत फराळाची भव्य व्यवस्था करण्यात आली होती. 'मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा' हा उदात्त हेतू समोर ठेवून हा उपक्रम राबवण्यात आला. निमित्त धार्मिक असले, तरी या माध्यमातून राष्ट्रीय सद्भावना आणि एकात्मतेचे एक उत्तम दर्शन घडल्याचे पाहायला मिळाले. सेवापथ सोशल फाउंडेशनच्या या उपक्रमास परिवारातील सर्व सदस्यांचे, हितचिंतकांचे तसेच नागरिकांचे सहकार्य लाभले. या सर्वांच्या बळावरच हा सेवायज्ञ यशस्वीपणे पार पडला. विविध क्षेत्रांतील मंडळींनी एकत्र येत या उपक्रमात सहभाग नोंदवला, ज्यामुळे धार्मिक सलोख्यासोबतच मानवी मूल्यांचे दर्शन घडले. फराळ वाटपादरम्यान संपूर्ण परिसरात "॥ विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल ॥" असा जयघोष सुरू होता, ज्यामुळे वातावरण अत्यंत भक्तीमय आणि सकारात्मक झाले होते. "पांडुरंगाच्या कृपेने आपल्या सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि आनंद नांदो. विठुरायाच्या नामस्मरणाने प्रत्येकाचे जीवन भक्ती, प्रेम आणि सकारात्मक ऊर्जेने उजळून निघो." अशी भावना सेवापथ सोशल फाउंडेशन परिवाराने व्यक्त केली आहे. संस्थेच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्वच स्तरातून कौतुक होत असून, भविष्यातही असेच समाजोपयोगी कार्य चालू ठेवण्याचा संकल्प सेवापथ परिवाराने केला आहे. या संपूर्ण सेवाकार्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे संस्थेच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत.

## साई ट्रस्ट विद्यालयात रंगला भक्तीचा मळा



दै हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** साई ट्रस्टचे अध्यक्ष नरसू पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली साई ट्रस्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयात आषाढी एकादशीचा सोहळा मोठया भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात शाळेच्या सुमारे अकराशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी सलवार कुर्ता आणि विद्यार्थिनींनी नऊवारी साडी परिधान केले होती आणि हातात भगवे झेंडे घेतले होते. विठू नामाच्या गजरात टाऊनशिपमध्ये विद्यार्थ्यांच्या घोषणांनी सर्वांचेच लक्ष वेधले होते. संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते.यावेळी जे एन पी ए चे अधिकारी वर्ग उपस्थित होते त्यामध्ये सयाजीराव साळुंखे मॅनेजर इस्टेट जे एन पी ए, प्रवीण पाटील लेबर वेल्फेअर ऑफिसर जे एन पी ए आणि संदीप घरत मॅनेजर जे एन पी ए यांनी सक्रिय सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे प्रशासकीय अधिकारी रमाकांत गावंड, माध्यमिक मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक गिरीश पाटील , बालोद्यान विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वैशाली बोरचटे, माध्यमिक इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक भूषण जाधव, आणि अंकुश जोगळे यांनी केले.सुरुवातीला शाळेचे आदर्श पिटी शिक्षक मनोहर टेमकर यांनी सर्व प्रमुख मान्यवरांचे महाराष्ट्राचे पारंपारिक नृत्य लेझीमच्या गजरात स्वागत केले. यानंतर रिंगण सोहळा संपन्न झाला. यावेळी शाळेचे संगीत शिक्षक पंडित गणेश बंडा यांनी आणि विद्यार्थ्यांनी भजन केले.दिंडी शिस्त आणि फलक लेखन कलाशिक्षक मिलिंद ठाकूर यांनी उत्तमप्रकारे केले.या रिंगण सोहळ्यात सर्व मान्यवरांनी सहभाग घेतला. जे एन पी ए चे उपस्थित सर्व अधिकारी विद्यार्थ्यासोबत नृत्याच्या भक्तीरसात दंग झाले. प्रमुख पाहुण्यांनी फुगडी देखील घातली.

यानंतर सर्व प्रमुख मान्यवरांनी श्री विठ्ठलाची मनोभावे पूजा केली. यावेळी साईट ट्रस्टचे अध्यक्ष नरसू पाटील सर यांनी सर्व मान्यवरांचे झाडाचे रोप देऊन स्वागत केले. यावेळी सयाजीराव साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेने आषाढी एकादशीची दिंडी काढताना पर्यावरणाचा संदेश दिल्याबद्दल अभिनंदन केले. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक तरी झाड लावले पाहिजे आणि ते जगविले पाहिजे असे आवाहन केले. तसेच इयत्ता दहावी आणि स्कॉलरशिप परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करावे असे आवाहनही त्यांनी केले.यावेळी साई ट्रस्टचे अध्यक्ष नरसू पाटील सर यांनी शाळेच्या इतिहासात अशाप्रकारे प्रथमच भव्य दिव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले असे म्हटले. तसेच तसेच मराठी माध्यमाचा निकाल गेली अनेक वर्ष सातत्याने १००% लागत आहे. तसेच तालुक्यातील मराठी माध्यमात पहिले चार विद्यार्थी मराठी माध्यमाचे आहेत असे म्हटले. इंग्रजी माध्यमाचा निकाल उत्तम आहे. यावर्षी अधिकाधिक विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा अधिक गुण मिळतील असे आश्वासन त्यांनी मान्यवरांना दिले.

त्यानंतर संगीत शिक्षक गणेश बंडा यांनी महाआरती घेतली. यामध्ये सर्व प्रमुख मान्यवरांनी सहभाग घेतला. यावेळी भजनाचा कार्यक्रम झाला. यामध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी कुमारी स्वरा कांबळे आणि यांनी सुंदर अभंग गायले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राथमिक इंग्रजी माध्यमाच्या सहशिक्षिका श्रीमती वंदना कपूर आणि माध्यमिक इंग्रजी माध्यमाच्या शिक्षिका श्रीमती कीर्ती शिरसाठ , किशोर म्हात्रे यांनी केले.आषाढी एकादशीच्या अभंगवाणी कार्यक्रमात इंग्रजी व मराठी माध्यमाचे इयत्ता दहावीचे खालील विद्यार्थी सहभागी होते

कु.स्वरा कांबळे,कु.प्रियांसी डाकी,कु.अविष्कार घोडके,कु. जिग्नेश,कु.तन्मय कोळी,कु. कार्तिक ठाकूर त्याचबरोबर या पर्यावरण रक्षण दिंडी सोहळ्यामध्ये शाळेच्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या भक्तिभावाने सक्रिय सहभाग घेतला. सर्वांच्या अथक परिश्रमामुळे कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No : MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## पंढरपूरात जि.प.ची महाअभियानात्मक स्वच्छता; श्रमदानातून परिसर चकाचक

### मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छता सेवा अभियान'



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : आषाढी एकादशीनिमित्त धाकट्या पंढरपूरात (ता. छत्रपती संभाजीनगर) श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्यासह मराठवाड्यातून मोठ्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती. भाविकांसाठी विविध ठिकाणी अन्नदानाचे स्टॉल उभारण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर परिसरात निर्माण झालेला प्लास्टिक, ओला व सुका कचरा तातडीने हटविण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी भव्य 'स्वच्छता सेवा अभियान' राबविण्यात आले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक वासुदेव सोळंके यांनी मोहिमेचे नियोजन केले. पंढरपूर, रांजणगाव शेणपुंजी, तिसगाव, पाटोदा आणि वळदगाव परिसरातील १७ ठिकाणे स्वच्छतेसाठी निश्चित करण्यात आली होती. प्रत्येक ठिकाणी विभागप्रमुख व गटविकास अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहीम राबविली.

रस्त्याच्या दुतर्फा साचलेला प्लास्टिक व अन्य कचरा गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या मर्यादित यंत्रणेला एवढ्या मोठ्या प्रमाणावर स्वच्छता करणे शक्य नसल्याने जिल्हा परिषद प्रशासनाने पुढाकार घेतला. या मोहिमेत जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील सुमारे १,००० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. शिक्षक, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी श्रमदान केले.

सुमारे तीन तास चाललेल्या मोहिमेत दोन ट्रॅक्टरभर कचरा संकलित करण्यात आला. ग्रामपंचायत तसेच वाळूज आणि वळदगाव ग्रामपंचायतींच्या घंटागाड्या व ट्रॅक्टरच्या साहाय्याने कचरा उचलून पुढील प्रक्रियेसाठी महानगरपालिकेकडे सुपूर्द करण्यात आला.

यावेळी पंढरपूर ग्रामपंचायतीच्या सरपंच वैशाली राऊत, उपसरपंच रेश्मा शेख, ग्रामविकास अधिकारी हरीश आंधळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, जिल्हा कृषी अधिकारी प्रकाश पाटील, उपायुक्त पशुसंवर्धन नानासाहेब कदम, विविध पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामसेवक, अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागरिकांनो, शहर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढे या

## विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी करत कडक सूचना

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर शहराला अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनविण्याच्या उद्देशाने विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांनी आज शहरातील स्वच्छता व्यवस्था आणि घनकचरा व्यवस्थापनाची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणी मोहिमेदरम्यान त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला अधिक सतर्क राहण्याचे आदेश देत कचरा संकलनापासून ते विघटनापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला.


शहरातील ढासळत्या स्वच्छता व्यवस्थेवर कडक पावले उचलत त्यांनी प्रशासनाला कामाला लावले असून नागरिकांनाही यात सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे. सकाळच्या सुमारास विभागीय आयुक्तांनी अचानक विविध भागांना भेट देऊन प्रत्यक्ष सुरू असलेल्या स्वच्छता कामकाजाची पाहणी केली. घरोघरी जाऊन कचरा संकलन कसे होते, गोळा झालेला कचरा ओला आणि सुका असा स्वतंत्रपणे गोळा केला जातोय की नाही, आणि त्याची वाहतूक कशी केली जाते, या सर्व बाबींची त्यांनी बारीकसारीक पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला. काम करताना त्यांना भेडसावणाऱ्या अडचणी, साधनसामग्रीची कमतरता आणि इतर समस्यांबद्दल विचारपूस करत त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आश्वासन दिले. कर्मचाऱ्यांच्या समस्या तात्काळ सोडविण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणेला दिले.



सध्या शहरात सुरू असलेले घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, शाश्वत आणि गतिमान करण्याची गरज असल्याचे मत विभागीय आयुक्तांनी व्यक्त केले. कचरा विलगीकरणाबाबत नागरिकांमध्ये अद्यापही पुरेशी जनजागृती झालेली नाही, यावर त्यांनी भर दिला.

शहरातील रस्त्यांवर किंवा उघड्यावर कचरा फेकणाऱ्यांवर आणि नियम मोडणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट आदेश त्यांनी दिले. तसेच कचरा प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता आणि तेथील कामकाजात हलगर्जीपणा चालणार नाही, असा इशारा देत आयुक्तांनी सर्व यंत्रणांना कामात सातत्य ठेवण्याचे निर्देश दिले. केवळ प्रशासकीय यंत्रणेच्या जीवावर शहर स्वच्छ होऊ शकत नाही, यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांनी केले.

शहर आपले आहे आणि ते स्वच्छ ठेवण्याची नैतिक जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. त्यामुळे नागरिकांनी कचरा इकडे-तिकडे न टाकता कचरा गाडीतच टाकावा, ओला आणि सुका कचरा नेहमी वेगवेगळा करून द्यावा आणि प्रशासनाच्या स्वच्छता मोहिमेला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रशासन आणि नागरिकांनी हातात हात घालून काम केल्यास छत्रपती संभाजीनगरला राज्यातील एक आदर्श आणि स्वच्छ शहर बनविल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांनी पाहणीच्या शेवटी व्यक्त केला.



## वेरूळ लेणी: पावसात निसर्गाचे रौद्ररूप आणि पर्यटकांची गर्दी

खुलताबाद तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरूळ लेणी आणि सीता न्हाणी'धबधब्याने पावसाळ्यात रौद्ररूप धारण केले आहे. संततधार पावसामुळे सर्व छोटे-मोठे झरे ओसंडून वाहत आहेत. हे मनमोहक दृश्य बघण्यासाठी शेकडो पर्यटकांची गर्दी झाली होती. भर पावसात पर्यटकांनी वेरूळ लेणीचा आनंद लुटला. या निसर्गरम्य वातावरणात पर्यटकांनी फोटो काढण्याचा आणि निसर्गाचा आनंद घेण्याचा पुरेपूर प्रयत्न केला*

# शहागंजचा ऐतिहासिक क्लॉक टॉवर पुन्हा बंद; परिसरात वाढली झाडे-झुडपे

## निजामकालीन ऐतिहासिक वास्तूच्या देखभालीकडे दुर्लक्ष; घड्याळ तातडीने सुरु करण्याची सैय्यद अशफाक अली यांची मागणी



**छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर शहराच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष देणारा शहागंज बाजारपेठेतील निजामकालीन ऐतिहासिक क्लॉक टॉवर पुन्हा एकदा बंद पडला आहे. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत दुरुस्ती करून ऑगस्ट २०२२ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या ऐतिहासिक घड्याळाची टिकटिक आता थांबली आहे. त्यातच टॉवरच्या परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे वाढल्याने या ऐतिहासिक वास्तूच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

शहागंज येथील हा क्लॉक टॉवर निजामकालीन इतिहासाची अनमोल धरोहर आहे. या टॉवरचे बांधकाम ३ मे १९०१ रोजी सुरू झाले आणि ३० ऑक्टोबर १९०६ रोजी पूर्ण झाले. हैदराबादचे सहावे निजाम मीर महबूब अली खान यांच्या राजवटीत उभारण्यात आलेल्या या वास्तूमध्ये ब्रिटिश आणि मुघल स्थापत्यकलेचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो. निजामांच्या राजवटीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने



या क्लॉक टॉवरची उभारणी करण्यात आली होती.

पूर्वी पवित्र रमजान महिन्यात सहरी व इफ्तारची वेळ कळावी, यासाठी या क्लॉक टॉवरची घंटा किंवा सायरन वाजविला जात असे. या घंटानादावरून परिसरातील मुस्लिम बांधवांना सहरी व इफ्तारची वेळ समजत असे. त्यामुळे या ऐतिहासिक घड्याळाला सामाजिक आणि धार्मिक जीवनातही विशेष महत्त्व होते. तसेच दररोज रात्री ८.३० वाजता बाजार बंद करण्याचा संकेत देण्यासाठीही या घड्याळाची घंटा वाजविली जात असल्याचे सांगितले जाते.

देखभालीअभावी हे ऐतिहासिक घड्याळ अनेक वर्षे बंद होते. त्यानंतर स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत क्लॉक टॉवरची दुरुस्ती करण्यात आली आणि नवीन इलेक्ट्रॉनिक घड्याळ यंत्रणा बसविण्यात आली. ऑगस्ट २०२२ मध्ये या ऐतिहासिक घड्याळाची टिकटिक पुन्हा सुरू झाली होती. मात्र, आता पुन्हा घड्याळ बंद पडले असून परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे वाढली आहेत.

**सैय्यद अशफाक अली यांची मागणी**

काँग्रेस माथाडी कामगार मराठवाडा सरचिटणीस सैय्यद अशफाक अली यांनी या ऐतिहासिक वास्तूकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. शहागंज क्लॉक टॉवर हा छत्रपती संभाजीनगरच्या ऐतिहासिक वारशाचा महत्त्वाचा भाग असून, त्याची नियमित स्वच्छता व देखभाल होणे आवश्यक आहे. बंद पडलेली घड्याळ यंत्रणा तातडीने दुरुस्त करून सुरू करावी, तसेच परिसरात वाढलेली झाडे-झुडपे हटवून स्वच्छता करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

ऐतिहासिक वास्तूंचे जतन करणे ही शहराच्या इतिहासाची आणि पुढील पिढ्यांच्या वारशाची जबाबदारी आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष न करता शहागंज क्लॉक टॉवरची तातडीने दुरुस्ती व सुशोभीकरण करावे, अशी अपेक्षा सैय्यद अशफाक अली यांनी व्यक्त केली आहे.

# सोयगाव शहरातील शिबिरात 2000 दिव्यांग बांधवांची मोफत आरोग्य तपासणी - 200 लाभार्थ्यांना जागेवरच दिव्यांग प्रमाणपत्र वाटप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२६ जुलै** : शहरातील उपजिल्हा रुग्णालयात येथे झालेल्या महाआरोग्य शिबिर तसेच मोफत दिव्यांग आरोग्य तपासणी व नूतनीकरण प्रमाणपत्र वितरण शिबिरात २०० दिव्यांगना जागेवरच दिव्यांग प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. आहे. या शिबिरात तालुक्यातील २ हजार विविध दिव्यांगाची आरोग्य तपासणी करण्यात आली होती.यामध्ये २०० जणांना जागेवरच प्रमाण पत्र वितरण करण्यात आले. राज्यातील हा पहिलाच तालुकास्तरावर प्रयोग असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.कमलाकर मुदखेडकर ( जिल्हा शल्यचिकित्सक चिखलठाणा संभाजीनगर ) यांनी दिलेल्या भेटदरम्यान सांगितले.

तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी



हा उपक्रम

सुरू करण्यात आला असून यात लाभार्थ्यांना आयुष्मान भारत कार्ड सुद्धा वितरीत करण्यात येणार असल्याची माहिती भाजपाचे अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी दिली. तालुका भाजपचे वतीने आयोजित या एक दिवसीय दिव्यांगाच्या शिबिरात सायंकाळी सहा वाजेपर्यंत २००० दिव्यांगा ची तपासणी पूर्ण झाली होती तर दोनशे दिव्यांगाना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले होते.भाजप चे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी

यांनी आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांची भेट घेऊन ही मोहीम राबवण्याची मागणी केली होती. त्या अनुसार या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

दिव्यांग नागरिकांना

> **शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन व नोंदणी सुविधा.श्रावणबाळ योजना,संजय गांधी निराधार योजना आदी योजनांची माहिती.दिली जाणार आहे.या शिबिरामुळे दिव्यांग नागरिकांना पेन्शन, शिक्षण,रोजगार, घरकुल, बँक कर्ज तसेच इतर शासकीय योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार असून, जिल्हा रुग्णालयापर्यंतचा वेळ, खर्च व धावपळही वाचणार आहे.**
>
> **- इद्रिस मुलतानी,भाजप अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष**

प्रमाणपत्रासाठी छत्रपती संभाजीनगर येथे खेट्या माराव्या लागत होत्या. आता त्यांना जागेवरच प्रमाणपत्र देण्यात आले आहे.या शिबिरात तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून दोन हजार दिव्यांग नागरिकांची मोफत वैद्यकीय तपासणी करून,पात्र २०० लाभार्थ्यांना जागेवरच नवीन व नूतनीकरण दिव्यांग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे.दरम्यान या शिबिरात जिल्हा परिषद सदस्या माहीन मुलतानी, जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,जेष्ठ नेते सुरेश बनकर,अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी,सोयगाव पंचायत समिती सभापती उत्तम चव्हाण,सोयगाव तालुकाध्यक्ष संजय पाटील,पश्चिम चे तालुकाध्यक्ष सुनील जाधव,पंचायत समिती सदस्य राहुल राठोड,जयश्री पवार,जिल्हा चिटणीस सुनील गावंडे, सोयगाव शहराध्यक्ष मंगेश सोहनी,व्ही जे एन टी चे प्रदेशाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण,मयुर मनगटे,गजानन पवार,संजीवन सोनवणे,राजेंद्र जावळे,वसंत बनकर,माजी उपगराध्यक्ष योगेश पाटील,आदींनी पुढाकार घेतला होता.

## मराठवाडा युवक विकास मंडळ, 'ग्रामविकास' तर्फे वृक्षारोपण



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : मराठवाडा युवक विकास मंडळ व ग्रामविकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने माजी नगरसेवक दामूअण्णा शिंदे यांच्या हस्ते सिडको एन-२ मधील उद्यानात कडूलिंब, पिंपळ ,जांभूळ, गुलमोहर आदी पर्यावरणपूरक वृक्षांचे रोपण करण्यात आले. याप्रसंगी प्रवीण घुगे मंडळाचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे, सचिव ॲड. अरविंद केंद्रे, मनोज शेवाळे, सुमित गायकवाड, ज्योती देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शिंदे व घुगे यांनी पर्यावरण संवर्धन व वृक्षारोपण काळाची गरज असल्याचे सांगितले. प्रास्ताविक शिवपुरे, तर आभार नामदेव कराड यांनी मानले. देवराव घोडके, लक्ष्मण गोरे, संभाजी पवार, प्रणव ताटू, प्रकाश हमणे, पुराणिक, कायंदे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी बालाजी बिरादार, निवृत्ती घोडके, पवन मोरे, गणेश भोसले यांनी परिश्रम घेतले.




*स्वर्गीय दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताह निमित्ताने आज मानूर येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेस च्या वतीने नेत्र रोग तपासणी नंतर ऑपरेशन शिबिर राबविण्यात आले.*

*यावेळी प्रमुख उपस्थिती राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे नांगणीकर ,युवक प्रदेश सरचिटणीस विक्रम नागशेट्टीवार ,युवक तालुका अध्यक्ष प्रशांत पाटील दोसापल्ले विलास पाटील शिंदे ,सुरेश आगळे ,डॉक्टर वर्ग गावातील प्रतिष्ठित नागरिक युवका सह अनेक जण उपस्थित होते..*

# आषाढी एकादशीनिमित्त राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठाचा भव्य सेवा उपक्रम

## 12 फूट उंच श्री विठ्ठल मूर्तीची स्थापना; 7 क्विंटल खिचडी, 4 हजार केळी व राजगिरा लाडूंचे भाविकांना प्रसादरूपाने वाटप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने अमरप्रीत हॉटेलसमोर श्री विठ्ठल भगवान यांच्या १२ फूट उंच भव्य मूर्तीची स्थापना करून आकर्षक धार्मिक देखावा साकारण्यात आला. यासोबतच वारकरी व भाविकांसाठी खिचडी, केळी, राजगिरा लाडू तसेच तुळशीपत्रयुक्त तीर्थाचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमादरम्यान हजारो भाविकांनी श्री विठ्ठल भगवान व पवित्र पादुकांचे दर्शन घेत भक्तिभावाने महाआरतीत सहभाग नोंदविला. सायंकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत श्री विठ्ठल भगवानांची भव्य महाआरती



उत्साहात पार पडली.

कार्यक्रमाला खासदार संदीपान भूमरे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, आमदार प्रदीप जैसवाल, संजय केनेकर, महापौर समीर राजूरकर, महानगरपालिका प्रभाग क्रमांक १९ व २० चे नगरसेवक, तसेच राजस्थानी समाजातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, राजस्थान प्रकोष्ठाचे मार्गदर्शक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आषाढी एकादशी निमित्त छोट्या पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकरी व भाविकांसाठी सुमारे सात क्विंटल खिचडी, चार हजार केळी आणि राजगिरा लाडूंचे प्रसादरूपाने वितरण करण्यात आले. या सेवा उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प प्रमुख जयप्रकाश खंडेलवाल, दीपक फुलभाती, मेघना विजयवर्गीय आणि मोनिका अग्रवाल यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सदस्य यांनी नियोजन, व्यवस्थापन व सेवाकार्यात सक्रिय सहभाग नोंदवून उपक्रम यशस्वी केला.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911